महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ
अमरावती विभागीय मंडळ अमरावती.
MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY AND HIGHER SECONDARY EDUCATION

पत्र क्रं अविमं/माप/ 6989

दि २७/०२/२०२६

**प्रति,**

मा. उपसंचालक,
माहिती व जनसंपर्क कार्यालय,
अमरावती विभाग अमरावती

**विषय** :- फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १० वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या खेळाडु विदयार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत.

**संदर्भ** :- पत्र क्रं रा.म./परीक्षा-७/९०९,दि.२६/०२/२०२६ रोजीचे पत्र.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या संदर्भाकित पत्रास अनुसरुन आपणास सविनय सादर करण्यात येते की, फेब्रुवारी/मार्च २०२६ च्या माध्यमिक शालांत प्रमाणपत्र (इ १०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणा-या खेळाडु विदयार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन दि.१५/०४/२०२६ पर्यत सादर करणेबाबतचे पत्र सोबत जोडलेले आहे. सदरच्या पत्रास आपल्या कार्यकक्षेतील वृत्तपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी देण्यात यावी.

आपली विश्वासू

S. Salunke 27.02.2026
(संगीता साळुंके)
विभागीय सहा.सचिव
अमरावती विभागीय मंडळ,अमरावती

**सहपत्र** :- प्रकटन

प्रतिलिपी :-

१) मा.सचिव राज्य मंडळ, पुणे
२) मा.विभागीय शिक्षण उपसंचालक, अमरावती विभाग,अमरावती.
३) शिक्षणाधिकारी(माध्यमिक)जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना माहितीस्तव.
४) जिल्हा क्रीडा अधिकारी (माध्यमिक) जि.प.अकोला/अमरावती/बुलडाणा/यवतमाळ/वाशिम यांना योग्य कार्यवाहीस्तव.

# महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे ४११ ००४.

## !!प्रकटन!!

**विषय :-** फेब्रुवारी–मार्च २०२६ च्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांचे क्रीडा सवलतीचे प्रस्ताव ऑनलाईन सादर करणेबाबत

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांचेशी संलग्न असलेल्या सर्व माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालयांचे मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी व पालक यांना सूचित करण्यात येते की, शासन निर्णय क्रमांक – उमाशि–२०१५/प्र.क्र.२६२/एस.डी.२ , दिनांक २० डिसेंबर २०१८ नुसार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इ.१०वी) परीक्षा व उच्च माध्यमिक प्रमाणपत्र (इ.१२वी) परीक्षेस प्रविष्ट होणाऱ्या खेळाडू विद्यार्थ्यांना व एन.सी.सी., स्काऊट गाईड मधील विद्यार्थ्यांना क्रीडा सवलतीचे गुण देण्यात येतात.

सदर शासन निर्णयानुसार जिल्हा क्रीडा अधिकारी यांचेकडून कीडा प्रस्ताव तसेच एन.सी.सी. स्काऊट गाईड इत्यादी प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडून दरवर्षी विभागीय मंडळाकडे सादर केले जातात.

त्याअनुषंगाने फेब्रुवारी – मार्च २०२६ च्या इ.१० वी व इ.१२ परीक्षेस प्रविष्ट खेळाडू विद्यार्थ्यांचे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकारी यांनी दि. १५/०४/२०२६ पर्यंत संबंधित विभागीय मंडळाकडे आपले सरकार पोर्टलव्दारे ऑनलाईन पध्दतीने पाठवावयाचे आहेत.

तसेच एन.सी.सी., स्काऊट गाईड चे प्रस्ताव शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी विभागीय मंडळांकडे प्रचलित पध्दतीने दि. १५/०४/२०२६ पर्यंत पाठवावयाचे आहेत.

याबाबत सर्व जिल्हा क्रीडा अधिकारी, सर्व शिक्षणाधिकारी (माध्यमिक) तसेच माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा/कनिष्ठ महाविद्यालये मुख्याध्यापक/प्राचार्य, शिक्षक, विद्यार्थी, पालक, व सर्व संबंधित घटकांनी उपरोक्त बाबींची नोंद घेऊन त्याप्रमाणे उचित कार्यवाही करावी.

दिनांक २६/०२/२०२६

Mali

(डॉ.दिपक माळी)
सचिव
राज्यमंडळ, पुणे-४

G:\Prakatn Kheladu prastav 2026.docx-2